


दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३५३ वा ● मंगळवार १४ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 353 | Date : 14/05/2024 blow Tuesday Page 4 Price 4


## घाटकोपरमध्ये होर्डिंग कोसळल्याची घटना : ८ जणांचा मृत्यू, ५९ जण जखमी

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून चौकशीचे निर्देश



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबईतील वादळामुळे घाटकोपरच्या पूर्व द्रुगती मार्गावरील पेट्रोल पंपावर मोठं लोखंडी होर्डिंग कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत ८ जणांचा मृत्यू झाला असून ५९ जण गंभीर जखमी झाले आहेत. तसेच आतापर्यंत ६७ जणांना बाहेर काढण्यात यश आलं आहे.

दरम्यान, या घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी दाखल होत परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी या घटनेची चौकशी करण्याचे निर्देश दिल्याचेही सांगितले.

ही घटना अतिशय दुर्देवी आहे. या घटनेची माहिती मिळताच मी लगेच मुंबई महापालिकेतील आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. याठिकाणी महापालिकेचे अधिकारी पोहोचले आहेत. तसेच बचावकार्य सुरू आहे. या घटनेत जखमी झालेल्यांना रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री । पान २ वर

# देशात चौथ्या टप्प्यात ६3.0४ टक्के मतदान; पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक मतदान

### ११ लोकसभा मतदारसंघात अंदाजे सरासरी ५९.६४ टक्के मतदान


मुंबई : राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील ११ लोकसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया संपली असून आज सायंकाळी ६ वाजेपर्यंत अंदाजे सरासरी ५९.६४ टक्के मतदान झाले असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली.

**चौथ्या टप्प्यातील एकूण ११ लोकसभा मतदारसंघनिहाय मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे :** नंदुरबार - ६७.१२ टक्के जळगाव - ५३.६५ टक्के रावेर - ६१.३६ टक्के जालना - ६८.३० टक्के औरंगाबाद - ६०.७३ टक्के मावळ - ५२.९० टक्के पुणे - ५१.२५ टक्के शिरूर - ५१.४६ टक्के अहमदनगर - ६२.७६ टक्के शिर्डी - ६१.१३ टक्के बीड - ६९.७४ टक्के

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात १० राज्यातील ९६ लोकसभा मतदारसंघासाठी आज मतदान पार पडले. चौथ्या टप्प्यात एकूण ६३.०४ टक्के नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या टप्प्यात पश्रि्चम बंगालमध्ये सर्वाधिक मतदानाची नोंद झाली. तर जम्मू काश्मीरमध्ये सर्वात कमी मतदान झाल्याचं बघायला मिळालं.

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, चौथ्या टप्प्यात पश्रि्चम बंगालमध्ये सर्वाधिक ७६.०२ टक्के नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. तर जम्मू काश्मीरमध्ये सर्वात कमी म्हणजेच ३६.८८ टक्के मतदानाची नोंद झाली. याबरोबरच आंध्र प्रदेशमध्ये ६८.२०



टक्के, बिहारमध्ये ५५.९२ टक्के, महाराष्ट्रात ५२.९३ टक्के झारखंडमध्ये ६४.३० टक्के आणि मध्य प्रदेशमध्ये ६९.१६ टक्के मतदान झाले. याशिवाय ओडिशात ६४.२३ टक्के, तेलंगणात ६१. ५९ टक्के, । पान २ वर

## नीरा उजवा कालवा दुरूस्तीसाठी बंद

**सोलापूर/प्रतिनिधी:**

रविवार दिनांक ०५ मे २०२४ रोजी सकाळी ८.०० ते ९.०० वाजेच्या दरम्यान नीरा उजवा कालवा कि.मी. ४९/९०० सेवा पथाकडील बाजूस मोठा घळ पडून माती मिश्रीत पाणी वाहू लागले होते. सदर ठिकाणी १ मी. व्यासाचा व ज्याची खोली मोजता आली नाही असा खड्डा पडून पाईपींग सुरू झाले. कालव्याचा विसर्ग कमी करून घळ काढण्याचा प्रयत्र करण्यात आला परंतू गळती पुर्णतः बंद झाली नाही. या कारणामुळे निरा उजवा कालवा दुरुस्तीसाठी बंद करण्यात आला आहे अशी माहिती नीरा उजवा कालवा विभागाचे कार्यकारी अभियंता शिवाजी जाधव कालव्याचा विसर्ग पुर्ववत केल्यास गळती वाढण्याची शक्यता लक्षात घेता व त्याखाली असलेली २००० लोकवस्ती बाधित होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्तहानी होऊ शकते.

यास्तव, कालवा विसर्ग बंद करून गळती पूर्णतः रोखण्याची कार्यवाही नीरा उजवा कालवा विभाग, फलटण या विभागामार्फत करण्यात येत आहे. असेही कार्यकारी अभियंता शिवाजी जाधव यांनी कळविले आहे.

## ईव्हीएम ठेवलेल्या गोदामाचे सीसीटीव्ही बंद असल्याचा सुप्रिया सुळेंचा आरोप

**बारामती/दैनिक यशसिध्दि न्यूज**

बारामती लोकसभा मतदारसंघातील मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोदामामधील सीसीटीव्ही प्रणाली ४५ मिनिटे बंद होती, असा दावा महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. त्यांनी यासंदर्भातील एक व्हिडीओ पोस्ट निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. ईव्हीएमसारखी अतिशय महत्वाची गोष्ट जेथे ठेवलेली आहे, तेथील सीसीटीव्ही बंद पडणं ही बाब संशयास्पद आहे, असे त्या म्हणाल्या. सुप्रिया सुळे यांनी एक्स या समाज




माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

बारामती लोकसभा मतदारसंघाचे मतदान पार पडल्यानंतर ईव्हीएम मशीन ज्या ठिकाणी ठेवल्या आहेत, तेथील सीसीटीव्ही कॅमेरे आज सकाळी ४५ मिनिटे बंद होते. ईव्हीएमसारखी अतिशय महत्वाची गोष्ट जेथे ठेवलेली आहे, तेथील सीसीटीव्ही बंद पडणे ही बाब संशयास्पद आहे. तसेच हा खूप मोठा हलगर्जीपणादेखील आहे. याबाबत निवडणूक प्रतिनिधींनी संबंधित अधिकारी आणि प्रशासनाला संपर्क साधला असता समाधानकारक उत्तरे आलेली नाहीत. तसेच या ठिकाणी टेक्निशियनदेखील उपलब्ध नाही, असा आरोप सुप्रिया सुळे यांनी केला आहे.पुढे बोलताना या घटनेला जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर । पान २ वर

## विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच आरटीई प्रवेश मिळणार

**सोलापूर/प्रतिनिधी:**

'आरटीई' प्रवेशाच्या नियमातील दुरूस्ती रद्द करून आता इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच प्रवेश मिळणार आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने त्यानुसार बदल करून प्रवेश प्रक्रिया राबविण्यासंदर्भातील आदेश शिक्षण संचालकांना दिले आहेत. येत्या शुक्रवारपासून नव्या आदेशानुसार पालकांना मुलांच्या प्रवेशासाठी नव्याने अर्ज करावे लागणार आहेत. सुधारित आदेशानुसार 'आरटीई' प्रवेशाच्या पोर्टलमध्ये बदल करावा लागणार आहे.




शिक्षण खात्याने 'एनआयसी'ला तशा सूचना केल्या असून त्यासाठी किमान तीन दिवस लागणार आहेत. त्यामुळे नवीन आदेशानुसार शुक्रवारपासून 'आरटीई' प्रवेशाला सुरुवात होणार आहे. नवीन बदलानुसार म्हणजेच पूर्वीप्रमाणे आता पालकांना त्यांच्या घरापासून एक किमी अंतरावरील शाळा निवडता येणार आहे. इयत्ता पहिलीत प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचा आठवीपर्यंतचा खर्च शासनाकडून संबंधित शाळांना दिला जाणार आहे.

## देशातील १३ विमानतळे बॉम्बने उडवून देण्याची धमकी, ईमेल प्राप्त होताच सुरक्षा यंत्रणा तैनात!

**लखनौ/दैनिक यशसिध्दि न्यूज**

देशात बनावट धमकीचं सत्र अद्यापही संपलेलं नाही. दिल्लीतील १०० शाळांना धमकीचे ईमेल प्राप्त झाल्यानंतर १२ मे रोजी १३ विमानतळ उडवून देण्याची धमकी मिळाली. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाला रविवारी १३ विमानतळे उडवून देण्याची धमकी देणारा ई-मेल प्राप्त झाला होता. ईमेलनुसार तत्काळ शोध मोहिमही सुरू करण्यात आली. परंतु, तपासादरम्यान काहीही संशयास्पद आढळलं नाही. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.



लखनौच्या चौधरी चरणसिंग आंतरराष्ट्रीय विमानतळ, भोपाळ, पाटणा, जम्मू आणि जयपूर विमानतळांवर बॉम्बच्या भीतीने दहशत निर्माण झाली. तपासणीनंतर, बॉम्ब धमकी मूल्यांकन समितीने धमकी 'नॉन-स्पेसिफिक' म्हणून घोषित केली.

चौधरी चरण सिंग आंतरराष्ट्रीय विमानतळ, लखनौ आणि इतर विमानतळांवर दुपारी ३ वाजून ५ मिनिटांनी स्फोटक उपकरणांबाबत । पान २ वर

## पुणे-सोलापूर महामार्गावर बसचा अपघात

### ट्रकच्या धडकेत एक ठार, ४ जण गंभीर जखमी



**मोडनिंब/प्रतिनिधी :**

पुणे-सोलापूर महामार्गावरील खंडाळी इथं लक्झरी बस व ट्रकच्या झालेल्या अपघातात एक प्रवासी ठार, तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. आज (ता. १३) पहाटे अडीचच्या सुमारास हा अपघात घडला. पुण्याहून सोलापूरकडे जाणाऱ्या एमएच १२ एसपी ५२७२ या मालवाहतूक ट्रकला मुंबईहून हैदराबादकडे जाणाऱ्या एमपी ०९ डीएल ८०९१ या खासगी लक्झरी बसने पाठीमागून जोराची धडक दिली. यामध्ये खासगी बसच्या केबिनचा चक्काचूर झाला. बसमध्ये ३५ ते ४० प्रवासी प्रवास करीत होते. प्रवासी झोपेत असल्याने जोरदार धक्क्यामुळे । पान २ वर

## पालखी मार्गावरील कामे १० जून पर्यंत पूर्ण करावीत :प्रांताधिकारी सचिन इथापे

**पंढरपूर/प्रतिनिधी**

आषाढी यात्रेसाठी श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासह अन्य संतांच्या पालखी सोहळ्याबरोबर मोठ्या प्रमाणात वारकरी भावीक चालत येतात.पायी पालखीसोहळ्या बरोबर येणाऱ्या वारकरी भाविकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने पालखी महामार्गावरील सेवा रस्त्याची दुरुस्ती, महामार्गावरील रस्त्यावरुन पालखी सोहळ्यास पालखी तळाकडे जाण्यासाठी व येण्यासाठी योग्य प्रमाणात उतार आदीबाबतची कामे १० जून पर्यंत पूर्ण करावीत, अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

आषाढी यात्रा पूर्व नियोजनाबाबत प्रांत कार्यालय पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली या बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, उप कार्यकारी अभियंता भिमाशंकर मेटकरी, नायब तहसिलदार मनोज, श्रोत्री, उपमुख्याधिकारी सुनिल वाळुंजकर, मंदीर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाढ, महावितरणचे श्री. भोळे यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, पालखी महामार्गावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून वाखरी पालखी तळालगत नवीन रस्त्याचे काम सुरु असून या ठिकाणी रस्त्यांची उंची वाढविण्यात आल्याने पालखी तळावर पालखी सोहळ्यास जाण्यासाठी व येण्यासाठी योग्य प्रमाणात उतार करण्यात यावा, भंडीशेगांव येथील चौरंगीनाथ महाराज पालखी तळाचे सपाटीकरण करण्यात यावे. पालखी मार्गावरील पाण्याच्या स्त्रोताची ठिकाणे निश्रि्चत करावेत तसेच पाणी भरण्यासाठी जाणाऱ्या टँकरला अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेवून तात्काळ नियोजन करावे. मंदीर समितीने भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी नियोजन करावे. आषाढी यात्रा कालावधीत ६५ एकर येथे येणाऱ्या दिड्यांची व भाविकांची संख्या विचारात घेता प्लॉटवाटपसह आवश्यक सुविधांचे नियोजन करावे.

महावितरने पाणी स्त्रोताची ठिकाणी अखंडीत वीज पुरवठा उपलब्ध ठेवावा. पालखी तळांवर तेसच शहरातील विद्युत दुरुस्तीचे कामे तात्काळ सुरु करा वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाच्या सूचनेनुसार मंदीर समिती व




नगर पालिकेने अधिकचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. आवश्यक ठिकाणी वाहन तळाचे मुरमीकरण करावे तसेच त्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था, प्रसाधनगृह, माहिती आदी सुविधा द्याव्यात. जलसंपदा विभागाने कुंभार घाटाची तात्काळ दुरुस्ती करावी. अन्न व औषध प्रशासनाने पालखी मार्गावरील व शहरातील खाद्यपदार्थाच्या दुकानांची तपासणी करण्यासाठी पथके नेमावेत. नगरपालिकेने अतिक्रमण काढण्यासाठी मोहिम राबवावी. आरोग्य विभागाने मुबलक प्रमाणात औषधसाठा उपलब्ध राहिल याचे नियोजन करावे अशा सुचनाही प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.भोसले म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांच्या सुरक्षेबरोबरच, वाहतुक व्यवस्था देखील महत्वाची आहे. यासाठी एसटी महामंडळाने एसटी बसेस त्यांनी निश्रि्चत केलेल्या वाहनतळाच्या ठिकाणीच पार्किंग कराव्यात. वारी कालावधीत पाऊस असल्याने पार्किंगच्या ठिकाणी मुरमीकरण करावे. एस.टी बसेस रस्त्याच्या कडेला लागणार नाहीत याची दक्षता घ्यावी. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांसाठी उपलब्ध सुविधांचे तसेच ठिकाणांची माहितीसाठी कायमस्वरूपी माहिती फलक लावावेत.पत्रा शेडमध्ये कुठल्याहीस्टॉलला परवानगी देऊ नये भीमा नदी पात्रावरील दगडी पुलाच्या साईट रोलिंगचे काम करावे. अहिल्या पुलावर पुरेशी प्रकाश व्यवस्था नसल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण होत असल्याने त्या ठिकाणी प्रखर प्रकाश व्यवस्था करण्यात यावी. तसेच मंदिर समितीने व नगरपालिकेने पोलीस प्रशासनाने निश्रि्चत केलेल्या ठिकाणी अधिकचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत अशा सूचनाही उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. भोसले यांनी यावेळी दिल्या

## संपादकीय

### तरच परिवर्तन होईल. ..

मतदानाचे वय २१ वर्षावरून १८ वर्षे करण्याची सगळ्यात महत्त्वाची आणि राजीव यांच्या कार्यकाळातील अखेरची घटनादुरुस्ती ठरली होती. आपल्या शेजारच्या चीनमध्ये मात्र अध्यक्ष शि जिनपिंग यांना घटनेनेच आजीवन कम्युनिस्ट पार्टीचा नेता म्हणजे पर्यायाने चीनचा अध्यक्ष राहण्याचा मान बहाल केला आहे. तशी घटनादुरुस्ती करून त्यांनी ते मिळवले आहे. आता रशियाचे व्लादिमीर पुतिनही २०३६ पर्यंत रशियाचे अध्यक्ष राहू शकणार आहेत. एका घटनादुरुस्तीमुळे पुतिन यांना हे शक्य होणार आहे. २०३६ मध्ये पुतिन ८३ वर्षांचे असतील आणि त्यांनी तोपर्यंत ते सत्तेत कायम राहिले तर स्टॅलिन यांना मागे टाकून ते रशियातले सगळ्यात जास्त काळ अध्यक्षपद भूषवलेले नेते असतील. हीच दोन देशांची कार्यपध्दती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भारतात आणायची आहे. म्हणून त्यांना पुन्हा एकदा सत्तेत यायचे आहे आणि देशाच्या घटनेला बदलून स्वतःला सर्वशक्तिमान नेता बनवून पुढील तीन दशके भारतावर राज्य करायचे आहे. एक देश एक निवडणूक या नवीन घटनादुरुस्तीच्या निमित्ताने त्यांना हा घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार प्राप्त होईल. मोदी पुन्हा सत्तेत आले की ते इलेक्टोरोल बाँडना अधिकृत करतील. जेणेकरून सरकार आणि सत्ताधारी राजकीय पक्ष यांना अधिकृतपणे खुलेआम मोठ्या कंपन्यांना धमकावून पैसे वसूल करण्याचा अधिकृत परवाना मिळेल आणि दुसरे एक देश एक निवडणुकीचा कायदा संमत करून घेतील. ज्यामुळे त्यांना देशाची लोकशाहीप्रणीत रचना बदलण्यास वाव मिळेल. एक देश एक निवडणूक ही अमेरिका, चीन आणि रशिया या देशातील लोकशाही पध्दती आहे. भारतात ती स्वीकारली गेली की सर्व निवडणुका म्हणजे पंचायत समिती, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, विधानसभा आणि लोकसभा एकत्रच घ्याव्यात असा घटनादुरुस्ती करून कायदा केला जाईल. सर्व अधिकार राष्ट्रपतींना बहाल केले जातील आणि राष्ट्रपतिपदाचा कालावधी हा किमान ३० वर्षांचा केला जाईल. ही घटनादुरुस्ती झाली की बहुमताच्या जोरावर मोदीच पुढील ३० वर्षे राष्ट्रपती होतील आणि देशाची संपत्ती अदानी आणि अंबानींच्या हवाली करून स्वतः भाइयों और बहनो करत भाषणे देत फिरतील. हे करण्यासाठीच त्यांना पुन्हा सत्ता हवी असून त्यांना घटनादुरुस्ती करायची आहे. म्हणून मोदींना मत म्हणजे भारताच्या संविधानिक रचनेला, लोकशाहीला तडा देण्यासाठी मत हे आपण ध्यानीमनी जपले पाहिजे. तर आणि तरच परिवर्तन होईल.

## शुर छत्रपती राजे संभाजी...



संभाजी महाराज हे जागतिक शुर राजांपैकी एक शुरविर राजे होत. भारतात जाती धर्मावरून भेदभाव करून महापुरुषांचे कर्तृत्व दाबण्याचा प्रयत्न येथील स्वयंघोषित श्रेष्ठ समजणारे विकृत विचाराचे लोक करत असतात. त्याला छत्रपती संभाजी महाराज अपवाद कसे ठरणार? छत्रपती संभाजी महाराज यांच्या शुर पराक्रमा विषयी लिहताना निच लोकांनी लेखणीचा गैरवापर करून छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचे आहे तसे वर्णन केलेच नाही. सर्व खेळ हा शब्दांचा व लिखाणाचा असतो. छयपती संभाजी महाराज यांनी पराक्रम गाजवले परंतु त्याच्या नोंदी ठेवणाऱ्या लोकांनी बदमाश पणा करून जागतिक शुरविर राजाला महाराष्ट्रा पुरते मर्यादित करून ठेवले. संभाजी राजे हे जिजाऊंच्या संकल्पनेतील स्वराज्याचे दुसरे राजे. जिजाऊंच्या संकल्पनेतील स्वराज्य म्हणजे जाती भेद, विषमता विरहित स्वराज्य होते. अठरा पगड जातीच्या लोकांना एकत्र करून त्यांच्या जोरावर राजेशाही मध्ये राजांकडून व त्यांच्या यंत्रनेकडून होणारी लुट व जनतेवर होणारे अन्याय अत्याचार थांबण्यासाठी स्वराज्य उभे केले गेले. व याच स्वराज्यामध्ये समता प्रस्थापित करून स्वराज्यातील जनतेवरील अन्याय अत्याचार बंद करण्याचे ध्येयधोरणे आखली गेली. अठरा पगडजाती, आलुतेदार, बलुतेदार सगळे लोक विषमतेच्या नावाखाली विभागले गेले होते. स्वराज्याच्या माध्यमातून एकत्र करण्याचे काम केल्या गेले. शुरविर, कर्मवीर असलेल्या संभाजी महाराज यांच्या विषयी इतिहासातील निच लोकांनी नैतिक बदनामी तर केलीच आहे परंतु संभाजी महाराज यांना धर्मवीर घोषीत करून त्यांचे कर्म लपण्याचे कटकारस्थान सुरू आहे. सध्या देशात सामाजिक विषमता व द्वेष वाढण्यासाठी ज्या महामानवांनी जनतेच्या कल्याणा साठी, देशाच्या हितासाठी आपले आयुष्य खर्च केले अशा लोकांना जातीत बंद करून त्यांचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न सतत होत आहे. विषमता वाद कायम रहावा आणि स्वयंश्रेष्ठ समजणाऱ्या लोकांचे नसलेले वर्चस्व कायम राहण्यासाठी इतिहासा सोबत छेडछाड करून चुकीचा इतिहास मांडला जातो. आणि अशा कुटील षडयंत्राला जाती धर्माच्या नावाखाली मेंदूचा वापर न करणारे लोक फसतात व असत्याला सत्य समजतात. कोणत्याही बाबीच्या मुळाशी जाऊन सत्य शोधन्याचा प्रयत्न करत नाहीत. आणि ज्यांनी सत्य शोधले त्याला धर्मविरोधी समजतात. छत्रपती संभाजी महाराज यांचा विचार केला तर स्वराज्यातील जनता सुखी होती मग तो कोणत्याही जाती धर्माचा का असेना सर्वांना समान न्याय होता. परंतु छत्रपती संभाजी महाराज यांची प्रतिमा धर्मवीर बनवून मुस्लिमांचे विरोधक अशी बनवली. परंतु इतिहासाची पाने चाळली असता छत्रपती संभाजी महाराज यांनी कोणी मुस्लिम आहे म्हणून त्याच्यावर अन्याय केला नाही किंवा कोणी हिंदु आहे म्हणून चुकिला माफ केले नाही. याचाच अर्थ छत्रपती संभाजी महाराज हे न्यायवादी कर्मवादी होते. स्वराज्याच्या विरोधात जो कोणी जाईल त्याला धडा शिकवण्याचे काम छत्रपती संभाजी महाराज यांनी केले. छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार व कार्य तरुणांमध्ये पेरले तर तरुणांवर चांगले संस्कार पडतील. आणि तरुणांवर चांगले संस्कार पडू नये, तरुणांना छत्रपती संभाजी महाराज कळूच नये म्हणून जाती धर्माचा आधार घेतला जातो. संभाजी महाराज हे मुसलमानां विरोधात नव्हते तर मुघलांच्या चुकिच्या व अन्याय अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधात हा लढा होता. छत्रपती संभाजी महाराज हे मुघल, सिद्दी व पोर्तुगीज यांच्या विरोधात लढले परंतु इतिहासात फक्त संभाजी महाराज यांचा संघर्ष मुघलाशी म्हणजेच मुस्लिमांशी दाखवला हा ऐतिहासिक बदमाशपणा आहे. कारण मुगल मुस्लिम होते म्हणून विरोध नव्हता तर परकीय होते आणि त्यांच्या काळात अन्याय अत्याचार होत होते म्हणून विरोध होता ही गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे. आता तर व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वाले एवढे विद्वान झाले की छत्रपतींचे नाव घेऊन फक्त धार्मिक द्वेष करत आहेत आणि राजकीय लोकांची झोळी भरून देत आहेत. व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या तज्ञांचे मॅसेज वाचले तर असे लक्षात येते की छत्रपतींनी फक्त मुस्लिम द्वेष करून मुसलमानांना मारले दुसरे काहीच काम केले नाही. परंत चुकिची माहिती फसरवताना खरी माहिती बाजूला जाते आणि चुकीची माहिती वारंवार ऐकल्याने चुकीच्या गोष्टींना सत्य समजले जाते. चुकीचा व घोडसळ इतिहास सांगितल्याने छत्रपतींचा अवमान होतो याचे गांभीर्य देखील कोणाला नाही. छत्रपती संभाजी महाराज यांचे संपुर्ण आयुष्य तिस बत्तीस वर्षाचे. एवढ्या काळात त्यांनी एकशे विस पेक्षा जास्त लढाया जिंकल्या त्याही एकही लढाईत न हरता. चार ग्रंथ लिहले तेही संस्कृत भाषेत, दहा पेक्षा जास्त भाषा त्यांना अवगत होत्या. या कार्यावर विचारावर अनेक लोक बोलणे टाळतात. आजही तिन बत्तीस वर्षाच्या तरूणाला विचारले की तुला आयुष्यात काय करायचे तर त्याच्या कडे उत्तर नसते.

परंतु छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या संपूर्ण आयुष्य ते करून दाखवले. छत्रपती संभाजी महाराज यांची व छत्रपती शिवाजी महाराष्ट्र यांची प्रतिमा फक्त धर्माभोवती आणि मुस्लिम विरोधक दाखवून त्यांच्या कर्मावर पडदा टाकणारे बदमाश व बदमाश लोकांच्या चुकीच्या गोष्टी सत्य माणणारे बुद्धीचा वापर न करणारे लोक यांच्या बुद्धीची किव येते. कारण जर छत्रपती यांनी धर्मासाठी काम केले असते तर अण्णाजी दत्तो आणि चिटणीस बाळाजी, आवजी, सोमाजी दत्तो, हिरोजी यांना हत्तीच्या पायी कशाला दिले असते? वरील लोक मुसलमान होते का? आणि छत्रपती जर धर्मासाठी लढत होते तर कृष्णा कुलकर्णी यांनी छत्रपती शिवाजी महाराष्ट्र यांच्या वर वार कोणत्या कारणाने केला असेल. छत्रपती संभाजी महाराज खरचं धर्मासाठी लढले तर संभाजी महाराजांवर वार करणाऱ्या कृष्णा कुळकर्णी चे धर्मविरोधी म्हणून दहण का केले जात नाही. मुघलांचा धर्म मुस्लिम म्हणून समस्त मुसलमानांना दोष दिला जातो तर हाच नियम कृष्णा कुळकर्णी ला लागु का होत नाही? इतिहासातील बदमाशी व व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या तज्ञांपासून सावध होऊन आपण छत्रपती संभाजी महाराज यांचे वास्तव कार्य व चरित्र बघितले तर छत्रपती संभाजी महाराज हे कुशल संघटक होते, शुरविर योद्धा होते, बहुभाषिक विचारवंत होते, थोरग्रंथकार होते, अन्याय अत्याचार खपवून न घेणारे मानवतावादी होते, जात धर्म न बघता चुक बघून शिक्षा करणारे न्यायवादी होते, वडीलांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी वडीलांसोबत दगाबाजी करणाऱ्यांना स्वकियांना हत्तीच्या पायी देणारे कठोर शासक होते. हे सर्वगुणसंपन्न छत्रपती संभाजी महाराज असताना काही धुर्त लोकांनी लेखणीच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र हनन केले. जर छत्रपती संभाजी महाराज धर्मासाठी लढले तर चरित्र हनन करणारे बदमाश धर्मविरोधी म्हणून घोषीत का केले जात नाही. धर्मवीर संभाजी राजे म्हणताना संभाजी राजेंना पकडून देणाऱ्या शिर्केंना धर्मविरोधी म्हणून का घोषित केले नसेल? हा संशोधनाचा विषय होय. डोळसपणे विचार केला तर संभाजी राजे हे समतावादी, मानवतावादी असुन शुर पराक्रमी होते. जे हजारो वर्षांपासून स्वतःलाच श्रेष्ठ समजून इतरांना तुच्छ समजत होते त्यांच्या जिव्हारी लागलेला राजा म्हणजे छत्रपती संभाजी महाराज. ज्यांनी विषमता, शोषण व भेदभाव याच्या आधारे समाजाची रचना केली तेथे छत्रपती संभाजी महाराज यांनी वडीलांचा वारसा चालवून समाता बंधुता व न्याय जनतेला दिला हे निच लोकांना पटणारे नव्हते.

म्हणून त्यांनी लेखणीच्या माध्यमातून संभाजी महाराज यांचे चुकीचे वर्णन करून शुरता दाबण्याचा प्रयत्न केला. परंतु काही निरपेक्ष इतिहासकाराच्या माध्यमातून सत्य इतिहास समोर आणुन छत्रपती संभाजी महाराज यांचे खरे कार्य प्रकाशात आनले. जयंती दिनी आपले अभिवादन सत्कामी लागावे असे वाटत असेल तर छत्रपती संभाजी महाराज यांचा सत्य इतिहास लोकांना सांगुन छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊन कोणतीही दंगल किंवा द्वेष निर्माण होऊ नाही. तरच छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन केल्याचे सार्थक होईल. छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या मंगलमय सदिच्छा..

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

### घाटकोपरमध्ये होर्डिंग कोसळल्याची..

एकनाथ शिंदे यांनी दिली.

पुढे बोलताना मुंबईतील सर्व होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश आयुक्तांना दिले असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईतील सर्व होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश आम्ही आयुक्तांना दिले आहेत. तसेच जे होर्डिंग अनाधिकृत आहेत, त्यावर कारवाई करून गुन्हे दाखल करण्याचे आदेशही आम्ही आयुक्तांना दिले आहेत, असे ते म्हणाले.

दरम्यान, पुढे बोलताना त्यांनी या घटनेत मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांना राज्य सरकारद्वारे आर्थिक मदत देणार असल्याची माहिती दिली. या घटनेत जखमी झालेल्यांच्या उपचाराचा खर्च सरकार करणार असून या घटनेत ज्यांच्या मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री साहायता निधीतून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल, असे त्यांनी सांगितलं. दरम्यान, या घटनेनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना त्यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. घाटकोपर भागात होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत ६७ नागरिकांना बाहेर काढण्यात आले आहे. मुंबई पोलिस, महापालिका, आपत्ती व्यवस्थापन असे विभाग समन्वय साधून असून, अडकलेल्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न युद्धस्तरावर करण्यात येत आहेत. जखमींवर राजावाडी रुग्णालयात उपचार करण्यात येत असून, त्यांना सर्वतोपरी सहाय्य करण्यात येईल. तसेच या घटनेची उच्चस्तरिय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून याप्रकरणी दोषी आढळल्या त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असे ते म्हणाले.

### देशात चौथ्या टप्प्यात ६३.०४..

उत्तर प्रदेशमध्ये ५८.०२ टक्के मतदान झाल्याचं बघायला मिळालं.

सोमवार १३ मे २०२४ रोजी सकाळी ७ वाजता चौथ्या टप्प्यातील मतदानाला सुरुवात झाली होती. चौथ्या टप्प्यात एकूण १० राज्यातील ९६ लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडले. उन्हाचा पारा बघता अनेक ठिकाणी मतदानाची वेळ सायंकाळी ६ पर्यंत वाढवण्यात आली होती. महत्त्वाचे म्हणजे ७ मे रोजी तिसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले होते. यावेळी आसामध्ये सर्वाधिक ७५.२६ टक्के, तर महाराष्ट्रात सर्वात कमी म्हणजेच ५३.७७ टक्के मतदानाची नोंद झाली होती.

### देशातील १३ विमानतळे बॉम्बने

धमकीचा ई-मेल आला. सीसीएसएआय विमानतळाच्या सुरक्षा पथकाने संपूर्ण विमानतळाची कसून तपासणी केली. तपासणीनंतर बॉम्ब धमकी मूल्यांकन समितीने 'नॉन-स्पेसिफिक' म्हणून जाहीर केले, असं केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने सांगितले. तपासणी आणि स्क्रिनिंग व्यतिरिक्त, लखनौ विमानतळ प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी अतिरिक्त पावले उचलत आहे, असेही त्यात म्हटले आहे.

दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि १० हून अधिक रुग्णालयांना ईमेलद्वारे बॉम्बच्या धमक्या मिळाल्या. दिल्ली पोलिसांनी नंतर सांगितले की ही धमकी फसवी होती आणि ईमेल पाठवणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास करण्यात आला.या महिन्याच्या सुरुवातीला, दिल्लीतील सुमारे १०० शाळा, नोएडामधील दोन आणि लखनऊमध्ये एका शाळेत बॉम्ब ठेवल्याची धमकी मिळाली होती. रशियन ईमेल सेवा वापरून या धमक्या पाठवण्यात आल्याचं चौकशीदरम्यान समोर आलं होतं.

### ईव्हीएम ठेवलेल्या गोदामाचे..

योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली. आमच्या प्रतिनिधींना ईव्हीएमच्या स्थितीची पाहणीदेखील करु दिली जात नाही. हे अतिशय गंभीर आहे. निवडणूक आयोगाने तातडीने याची दखल घेऊन सीसीटीव्ही का बंद पडला, याची कारणे जाहीर करावी. याखेरीज संबंधित घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करणे गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या.दरम्यान, यांप्रकरणी आता बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकारी कविता द्विवेदी यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. कोरेगाव पार्क येथील भारतीय खाद्य निगमच्या गोदामात बारामती लोकसभा मतदारसंघातील मतदान झालेली मतदान यंत्रे ठेवण्यात आली आहेत. संबंधित ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असून इलेक्ट्रेशियन काम करत असताना त्याने एक वायर काढलेली असल्याने दूरचित्रवाणीच्या पडद्यावर चित्रिकरण काही वेळ दिसत नव्हते. मात्र याबाबत तातडीने चौकशी करून संबंधित यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली आहे, असे त्या म्हणाल्या.याशिवाय सुप्रिया सुळे यांनी आणखी एक व्हिडीओ पोस्ट करत एका मतदान केंद्रावरील पोलीस अधिकारी भाजपाच्या उमेदवारांचा प्रचार करत असल्याचाही आरोप केला. पाथर्डी तालुक्यात मतदान प्रक्रिया राबविणारा कर्मचारीच भाजपा उमेदवाराचा प्रचार करीत असल्याचा एक व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे. जर हा व्हिडीओ खरा असेल तर हे निपःक्ष मतदान प्रक्रिया आणि सशक्त लोकशाहीच्या दृष्टीने अतिशय घातक आणि चिंताजनक आहे, असे त्या म्हणाल्या.

### पुणे-सोलापूर महामार्गावर ...

अनेक प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. अपघातातील मृत व जखमींची नावे समजू शकली नाहीत. अपघातस्थळी वरवडे व सावळेश्र्वर येथील टोलनाक्याच्या महामार्ग गस्ती पथकामधील डॉ. गोरखनाथ लोंढे, इरेश कस्सा, पवन फाटे, रोहित काकडे यांनी रुग्णवाहिकेतून जखमींना सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले.महामार्ग पोलीस केंद्र मोडनिंब व मोहोळ पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यास मदत केली. पहाटे झालेल्या या अपघातामुळे महामार्गावर जवळपास चार किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.




## स्वरचित लेख दुनियादारी..!

गर्दीतल्या गर्दीत दर्दीच फार झाले
अनोळखी सारेच स्वदुखाने गार झाले

जिकडे बघावे तिकडे नुसतेच घोळके, टोळके, गराडे आणि आजुबाजुला भिरभिरणारी जिवंत यंत्रवत माणसे. प्रत्येकजण आपल्याच विश्र्वात हरवलेला. कोणी प्रेमात गुंगलेला तर कोणी छंदात गुंतलेला. कोणी दुःखात डुंबलेला तर कोणी संकटांनी भांबावलेला. कोणी आनंदाने हरकलेला तर कोणी व्यसनांनी दुर्मुखलेला.

माणसाला अगणित नातीगोती असुनही त्याला कोणीच नसते. किती भयानक विसंगती आहे ही. कारण रोजच्या व्यवहारी जगात माणुस क्षणक्षण खचत जातो.तुटत जातो. स्वकियांपासुन दुरावत जातो.


माणसाच्या मनाच्या वलयात तो आणि फक्त तोच असतो. पती, पत्नी, अर्धांगिनी, अपत्य, आई, वडील, भावंडे कितीही जवळची असली तरी त्याचे मन जाणणारी एकही व्यक्ती त्याच्याजवळ नसते. स्त्री असो की पुरुष व्यथा एकच प्रचंड गराड्यात आलेला एकटेपणा.

कारण माणुस ऋ्ळींश ढरज्ञश आयुष्य जगत असतो. सगळेच जगतात. पण जेव्हा रस्त्यावर अपघात झालेला एखादा तरुण मदतीच्या अपेक्षेने तळमळत असतो तेव्हा ड्रायव्हिंग सीट वरचा तो ऑफीसला वेळेवर पोहोचण्याच्या विचारांत असतो. .....ती 'मला काय जमणार येईन ईतर कोणी मदतीला' ह्या विचारांत असते..... प्रत्येकाला स्वताचे विश्र्व महत्वाचे असते. लोक जखमांनी, रक्तांनी माखलेल्याला बघत आजुबाजुचे निघुन जात असतात. पण हा जमाव असा हृदय शुन्य का बनतो आहे याकडे कोणीतरी लक्ष पुरवेल का?

प्रत्येकालाच व्यथा असतात हो. पण जरा ह्या दुनियेकडे किंचितसे मैत्रीने पहाल तर नक्कीच एक थेंब जरी ओलावा निर्माण झाला ना तरी पुरे हो... माणसाला एकटेपणा तून बाहेर पडायला.

मैत्री करा. माणसांवर प्रेम करा. एकमेकांना मदत करा. ओळखी, अनोळखी हा विचार न करता विचारपुस करा. संवाद साधा. कोणीही कोणाशीही कधीही काहीही कसेही कोणत्याही भाषेत बोला.... चर्चा सत्रे चालवा. दुनियादारी तुन बाहेर पडुन हसत खेळत जिवन जगणे काळाची गरज आहे. नाहीतर आपली पुढची पिढी यंत्रांवर चालणार्या रोबोट सारखी वावरतील. भावनाशुन्य!!!!!

**कीर्तिसंध्या /अंबरनाथ.**
**मो.८४२१७५२३१५**
**७०८३३५१७२५**



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# निलेश साबरे यांच्या विजय निर्धार यात्रेचं सर्वत्र भव्य स्वागत

**ठाणे/मिलिंद जाधव**

भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागात भिवंडी लोकसभा उमेदवार निलेश सांबरे यांच्या विजय निर्धार यात्रेला मतदांराचा उस्फूर्त प्रतीसाद मिळत असून गावोगावी मोठया उत्साहात निलेश साबरे यांच्या विजय निर्धार यात्रेचं गावोगावी भव्य स्वागत होतांना दिसत आहे. जशी निवडणुकीची तारीख जवळ येत आहे, त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात प्रचाराला गती मिळत असल्याचे दिसून येत आहे. कल्याण, मुरबाड,बदलापूर येथे निलेश साबरे यांचं भव्य स्वागत करण्यात आले. ८ मे पासुन भिवंडी लोकसभा अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांनी मतदांराशी संपर्क साधण्यासाठी विजय निर्धार यात्रा सुरु केली असुन तिची सुरुवात वज्रेश्र्वरी, गणेशपुरी येथुन सुरुवात होऊन अंबाडी दुगाडफाटा आनगांव दाभाड मार्ग गोंदाडे (पाच्छापुर) येथे पोहोचली होती. यावेळी जेसीबीच्या सहाय्याने निलेश सांबरे यांच्यावर फुलांची उधळण करीत फटाक्यांच्या आतिशबाजीत भव्य स्वागत करण्यात आले. तर निर्धार यात्रा ज्या गावातुन जात होती तिथे सांबरे यांचे भव्य स्वागत करुन विजय निर्धार यात्रेला



प्रतिसाद चांगला मिळत आहे. डोलखाब येथे निलेश सांबरे यांच्यावर फुलांची उधळण करत जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी डोलखांब विभागातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तर जिजाऊ संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या वतीने वाकी पाडा,जाणवलं, खाडवल,उसरोली, कुकसे बोरिवली, भोइरपाडा, सापे, वाहुली, वाशेरे, येथे निर्धार यात्रेच्या माध्यमातून मतदांराशी संपर्क साधण्यात आला. व प्रचार ,प्रसार करण्यात आला.

मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघातून ही विजय निर्धार यात्रा मार्गक्रमण करणार आहे. यात्रेच्या माध्यमातून निलेश सांबरे यांनी जिजाऊ संघटनेच्या माध्यमातून केलेले सामाजिक कामांची माहिती लोकांपर्यंत पोहचवून सांबरे यांना निवडून देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सांबरे यांच्या 'शिलाई मशीन' या निवडणूक चिन्हाचा प्रचार करण्यावर कार्यकर्ते भर देत आहेत. 'मतदार राजा जागा हो... शिलाई मशीनचा धागा हो...', 'निलेश सांबरे आगे बढो, हम तुम्हारे साथ है', अशा घोषणा विजय यात्रेत दिल्या जात आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील महत्वाची लढत म्हणून भिवंडी लोकसभा मतदारसंघाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर यावेळी विजय निर्धार यात्रेत जिजाऊ संघटनेचे कार्यकर्ते मोठया संख्येने सहभागी झाले होते.

# भरधाव आलिशान वाहनाची उभ्या असलेल्या कारला जोरदार धडक


## थरारक पाठलाग केल्यानंतर आरोपीची गाडी पकडण्यास पोलिसांना यश

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्गावरील नैताळे येथे दि १२ रोजी रस्त्याच्या खाली उभ्या असलेल्या स्विफ्ट कारला नशेत बेधुंदपणे चालवणाऱ्या आलिशान टाटा हेक्सा गाडीने जोरदार धडक दिली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे निफाड-छत्रपती संभाजीनगर राज्यमहामार्गावरील नैताळे येथे रस्त्याखाली उभ्या असलेली स्विफ्ट एम एच १५ ई पी ७३४५ कारला अचानक मागून आलेल्या टाटा कंपनीच्या आलिशान हेक्सा एम एच १५ जी बी ७००० या गाडी चालकाने अतिशय बेधुंदपणे भरधाववेगाने धडक दिल्यामुळे स्विफ्ट कारमधील दोन प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे.

त्यानंतर सदर वाहनाला नागरिकांनी अडवण्याचा प्रयत्न केला असताना




देखील कोणालाही न जुमानता आरोपी गाडी घेऊन पसार झाले.त्यानंतर तत्काळ लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तत्काळ प्रसंगावधान राखत विंचूर येथे गाडी अडवण्याची सूचना दिल्याने पोलीस नाईक संदीप निचळ यांनी गाडी अडवण्याचा प्रयत्न केला पण त्यांना देखील हुलकावणी देत आरोपी गाडी घेऊन पसार झाल्याने पाठलाग सुरु झाला त्यानंतर भरधाव गाडी लासलगाव येथे आल्यानंतर

, पोलीस नाईक दगू शिंदे व संदीप निचळ यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अतिशय कार्यकौशल्याने लासलगाव येथील आठवडे बाजारात पुन्हा अपघात होण्याच्या शक्यतेने पोलिसांचे पेट्रोलिंग वाहन गाडीसमोर आडवे लावून हेक्सा गाडी अडवण्यास यशस्वी ठरले आहे.

त्यानंतर रात्री उशिरा निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस निरीक्षक नंदकुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक मच्छिंद्र खरात पुढील तपास करीत आहेत.

# मुंबई मधील पावसाच्या एका झलकेने मुंबई लोकल रेल्वेचे तीन तेरा

**मुंबई/विजय घनघाव**

मुंबई आणि ठाणे जिल्हा ग्रामीण भागात अचानक आलेल्या पावसाच्या सरीने मुंबई लोकल चे तीन तेरा वाजले... आज आठवड्यचा पहिला दिवस.... सकाळी ठाणे स्थानकात झालेल्या सिग्नल यंत्रणा बिघाडामुळं आज सकाळी मुंबई लोकल सेवा एक ते दीड तास उशिरा सुरु होती.. तर संध्याकाळी आलेल्या पावसाच्या सरीने आणि सोसाट्याचा वाऱ्याने ठाणे मुलुंड मध्ये विजेचा खांब वाकला.. यामुळे मध्य रेल्वे ची लोकल सेवा भलतीच खोळंबली... हजारो रेल्वे प्रवाशांना रेल्वे स्थानक तर अनेकांना लोकल मध्ये अडकून पडावं लागलं आहे...यामुळे लोकल प्रवाशी चाकरमानी भलताच संतापलेल्या अवस्थेत



दिसून येत होता... ठाणे ग्रामीण शहापूर भागात पावसाच्या गारा पडताना दिसतं होत्या... अर्धा ते एक तास पडलेल्या पावसाने हवेत गारवा निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत होते..

# दुचाकीसाठी सुरु होणाऱ्या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवणेकरिता आगाऊ अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर/प्रतिनिधी:**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर या कार्यालयात लवकरच दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत असून वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गदी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व ब-याच वेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा,

यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक १५ मे २०२४ ते १७ मे २०२४ पर्यंत सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डी डी (केवळ क्र १६ अन्वये जारी झालेले डी डी), पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा. सदर डीडी फक्त ऊ्र ठ.ढ.ज. डेश्र्ररिीं यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बॅंकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील,

अर्जासोबत केंद्रिय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ४ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५ अ मध्ये विहीत केलेल्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल (उदा. आधार कार्ड, टेलिफोन बील इ.)

एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दिनांक १७ मे २०२४ रोजी दुपारी ०५.०० वाजता कार्यालयीन नोटीसबोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी सोबतच्या वेळापत्रकानुसार दर्शविलेल्या दिवशी (दि.२० मे २०२४ ) रोजी दुपारी ०३:०० वाजेपर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा. लिलावासाठी सादर केलेला डीडी रुपये

### नविन दुचाकी मालिकेचे वेळापत्रक (एम.एच.१३ ईएम)

दि. १५ मे २०२४ तिप्पट शुल्कचे अर्ज व दुचाकी वाहनांसाठी नियमित अर्ज स्विकारणे.दि.१७ मे २०२४ वेळ - ११ ते ४ दि.१७ मे २०२४ - सायंकाळी ०५.०० वाजता यादी जाहिर . दि.२० मे २०२४ दुपारी ०३ वाजेपर्यत बंद लिफाफ्यात लिलावासाठीचे डीडी स्विकारणे रुपये ३००/- पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे.दि.२० मे २०२४ तिप्पट शुल्काच्या आलेल्या अर्जासाठी व दुचाकी वाहनांसाठी आलेल्या डबल अर्जाचा लिलाव दुपारी ०४.०० वाजता.

३००/- पेक्षा कमी रकमेचा नसावा. सदर डीडी फक्त ऊ्र ठ.ढ.ज. डेश्र्ररिीं यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बॅंकेंचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील डीडी कमीत कमी एक महिना मुदतीमध्ये असावा.

दिनांक २० मे २०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तीसमोर (संबंधित अर्जदार) लिफाफे उघडुन ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून २० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल, कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही., वाहन धारकाने एका वाहनासाठी एकापेक्षा जास्त आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयात डी.डी. जमा केल्यास सदर बाबीस कार्यालय जबाबदार राहणार नाही अशी माहिती सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी सोलापूर श्री विजय तिराणकर यांनी दिली आहे



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे मी या पदापर्यंत पोचलो आहे : सचिन बनसोडे

**अक्कलकोट/प्रतिनिधी:** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच माझा रेल्वे सेवेत नियुक्ती झाली आणी विविध क्षेत्रात बढती ही मिळाले आहे.अशी प्रतिपादन सोलापूर रेल्वे विभागाच्या मुख्य कल्याण निरीक्षक सचिन बनसोडे यांनी व्यक्त केली आहे.त्यांना बढती मिळाल्याने रिपाइं(आठवले गट) च्या वतिने सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी व दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी यांच्या हस्ते सन्मान करून गौरविण्यात आली आहे. सचिन बनसोडे यांच्या मुंबई नार्कोटिक कंट्रोल ब्यूरो येथे बढती झाल्याने सोलापूर मंडल रेल्वे मजदूर कार्यालय येथे सचिन बनसोडे यांच्या रिपाइं तर्फे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आली होती.

याप्रसंगी सत्कार स्विकारुन सत्काराला उत्तर देतांना बोलत होते.या प्रसंगी कार्यालय अधिक्षक अजय लोंडे,मुख्य टिकट निरीक्षक श्रावण चित्यालकर,वरीष्ठ टेक्निशियन प्रताप जाधव,दुधनी बुकींग सुप्रवायजर वेलुमुरगन केशवन,सोलापूर बुकींग सुप्रवायजर बालकृष्ण स्वामी, रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,आदी उपस्थित होते.

# आ.नाडगौडा यांची कसबा मंडळास सदिच्छा भेट

सोलापूर/प्रतिनिधी: कर्नाटक राज्यातील मुद्देबिहाळ येथील काँग्रेसचे आमदार आप्पाजी नाडगौडा यांनी बाळीवेस येथील श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळास सदिच्छा भेट घेऊन श्रींचे सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी मंडळाच्यावतीने आमदार नाडगौडा यांना त्यांची पत्नी अपूर्वा यांच्यासह श्रींची प्रतिमा भेट देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.



मंडळाचे उत्सवाध्यक्ष शशिकांत बिराजदार यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी ट्रस्टी केदार मेंगाणे, शिवानंद बुगडे, मल्लिनाथ दर्गो पाटील, अप्पासाहेब कुताटे, पुष्कराज मेत्री, अशोक बोरामणी यांच्यासह मंडळाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाळणाघरांचा उपक्रम लक्षणीय आणि उपयुक्त ठरला

**छत्रपती संभाजीनगर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणूक २०२४ साठी मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा प्रशासनाने विविध उपक्रम राबविले. त्यात लक्षणीय आणि अभिनव उपक्रम ठरला तो मतदान केंद्रांवर पाळणाघरे स्थापित करण्याचा. हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. अनेक मातांनी आपलं कडेवरचं बाळ पाळणाघरात सांभाळायला देऊन आपले लोकशाहीप्रति कर्तव्य बजावले.'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी', ही मातेची महती. आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मातांनी आपली बालके प्रशासनाने उभारलेल्या पाळणाघरात सोपवून आपला मतदानाचा हक्क बजावला, आणि ही मतदार माऊली लोकशाहीची उद्धारकर्ती झाली. महिला मतदारांचा मतदानाचा टक्का वाढावा यासाठी जिल्हा प्रशासनाने अनेक उपक्रम राबविले. त्यात हा उपक्रम सर्वात उपयुक्त आणि लक्षणीय ठरला. मतदान केंद्रांवर पाळणाघरे स्थापित करण्याबाबत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यंत्रणेला निर्देश दिले. त्यानुसार महिला बालकल्याण विभागामार्फत कार्यवाही करुन अंमलबजावणी करण्यात आली. एखादी माता मतदानासाठी आली असता तितकावेळ तिच्या कडेवरील बाळाचा चांगल्या



पद्धतीने सांभाळ होणे अपेक्षित आहे. किंवा मतदार लहान मुलासह मतदानाला आल्यास त्या मतदाराला मतदान करण्यासाठी जितका वेळ लागेल तितका वेळ त्या बाळाला सांभाळण्यासाठी पाळणा घर सुविधा देण्यामागचा विचार होता.

प्रत्येक पाळणाघर एका अंगणवाडी ताईंकडे सोपविण्यात आले. या ठिकाणी येणाऱ्या बालकाला तिथं अनेक खेळणी, झोपाळ्यात असलेल्या बालकांसाठी प्रत्यक्ष पाळणे, प्यायचे पाणी, बेबी फुड आदींची सज्जता होती. जिल्ह्यात शहरी भागात १८० तर ग्रामिण भागात १६५० पाळणाघरे सज्ज होते. ज्या इमारतीत अनेक मतदान केंद्र असतील तेथे त्या इमारतीत एक पाळणा घर याप्रमाणे नियोजन होते. पाळणाघराचा लाभ हा स्तनदा माता, लहान बालके असणाऱ्या मातांना खूप झाला. त्यांनी आपली बालके पाळणाघरात सोपविली. तेथली खेळणी व आकर्षकता पाहून बालकेही तिथे रमली. बागडली. त्यांच्या किलबिलाटाने पाळणाघर गजबजले. लोकशाहीसाठी आपले मतदानाचे कर्तव्य बजावणाऱ्या मातांना ही एक चांगली सुविधा होती. त्यामुळे महिलांचा मतदानातील सहभाग होतांना दिसत होता.

## एक व्हा,नेक व्हा आणि स्वाभिमानाने एक नेता, एक पक्ष, एक झेंडा हाती घ्या...

# नाग समुदायाच्या हाती राजकीय सुत्रे या विषयावर वैचारीक प्रबोधनात्मक ४६ वी साप्ताहिक कार्यशाळा



**छत्रपती संभाजी नगर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

समाज जीवनात कार्यरत बुद्ध फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, ७ व ८ मे १९३२ ला नागपूर येथील अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या अधिवेशनात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, अस्पृश्य समाजाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. त्या विधानाची वर्तमान प्रासंगिकता आणि संदर्भ लक्षात घेऊन सुरूवातीला बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या अनुषंगाने संघर्ष केला असला तरी पुढे जाऊन मानवतावादी दृष्टीकोनातून या देशातील द्रविड व नाग लोक एकच असल्याचे स्पष्ट करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लढा दिला आहे. याची जाणीव ठेवून त्या संदेशाच्या ९२ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? आपली त्यात भागीदारी किती? यावर विचारमंथन व्हावे म्हणून नाग लोकांच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-खछ-) आईनाच्या संयुक्त विद्यमाने ४६ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ५ मे २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन बहुजन समाज भुषण पुरस्कार प्राप्त उद्धव बनसोडे म्हणाले की, साधा विजेचा दर ठरविण्याचा अधिकार आपणांस असुन सुद्धा टाळूवरील लोणी खाणारे ठरवीत आहेत. न्यायालयातील काही न्यायधीश सुद्धा पूर्वग्रहदूषित भावनेने वागत आहेत. मूलनिवासीयांचे हक्क अधिकार नाकारले जात आहेत. आंबेडकराईट नसलेले प्रतिनिधी निवडल्याने आपली वाताहात झाली आहे. आपली माणसे मोठी झाली की समाजाला विसरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, उच्चाधिका-यांनी आपण ज्या झोपडपट्टीतून आलो, त्या झोपडपट्टीतून लाल दिव्याची गाडी फिरविली पाहिजे. जेणेकरून त्या झोपडपट्टीत राहणा-या जनतेला प्रेरणा मिळेल. आपल्या जनतेवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला आळा घालण्यासाठी सत्तेच्या चाब्या आपल्या ताब्यात असायला हव्यात. करिता सत्तेचे गणित समजून घेऊन योग्य प्रतिनिधी निवडले पाहिजेत.

या प्रसंगी धनराज गोंडाणे म्हणाले की, भारताचे संविधान आणि धम्म एकच आहे. करिता त्याची जोपासना करण्यासाठी धम्म पालनाने शीलवान, गुणवान मानसे निर्माण होणे आवश्यक आहे. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व विकसित केले पाहिजेत. सुशिक्षितांनी मागे वळून सिंहावलोकन केले पाहिजे. राजू काटोले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेसमोर कोलंबिया विश्र्वविद्यालयात ढहश डूलेश्र`ष घपुेश्रशवसश अर्थात ज्ञानाचे प्रतिक असे लिहिले आहे. ज्यामुळे बराक ओबामा सारख्या महनीय व्यक्ती पुढे आल्यात. महादेव डांबरे म्हणाले की नाग लोकांच्या हाती सत्तेची सुत्रे आल्याशिवाय आपला विकास होणार नाही. भारतातील प्रत्येक नागरिकांच्या अंगी भारतीयता भिनली पाहिजे. काय आपण मूर्ख, नालायक आहोत? ज्यामुळे ४ टक्के शेटजी, भटजी, लाटजी आपल्यावर राज्य करतात. करिता ८५ टक्के मूलनिवासी बहुजन समाजाचे ऐक्य झाल्यावर आपली सत्ता असेल. म्हणून एक व्हा, नेक व्हा आणि एक पक्ष, एक नेता, एक झेंडा हाती घ्या. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, गिळलेला घास आणि घेतलेला श्र्वास हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच मिळाला आहे. याची जाणीव ठेवून लढला नाहीस तरी चालेल पण विकला जाऊ नकोस, ही भूमिका पार पाडावी लागेल. सत्ता हेच सर्वस्व नाही तर सामाजिक क्रांती नंतरच राजकीय क्रांती होऊ शकेल. याची जाणीव ठेवून मार्गक्रमण करावे लागेल. प्रा. मंगला झिने म्हणाल्या की, उच्चभ्रू वसाहतीतील लोकांचा सुद्धा सामाजिक कार्यात सहभाग नसतो. आंबेडकराईट व्हायला कुणी तयार नाहीत? निवडणूकीत उमेदवाराचे चारित्र्य, गुणवत्ता तपासून निवड केली पाहिजे. अन्यथा नोटाचा वापर करावा. संघदीप रोडगे म्हणाले की, केवळ राजकीय सुत्रे हाती आल्याने समस्या सुटतील काय? ब्राह्मण समाजातील लोक राजकीय सुत्रे इतरांच्या हातात देऊन राज्यकारभार स्वतः बघतात. इतिहासातून धडा घेतला नाही तर इतिहास आपणास धडा शिकवेल. सत्तेत येण्यासाठी संघटीतपणे शिस्त पाळली पाहिजे. करिता केवळ रक्तातील नव्हे! तर वैचारिक निष्ठावान लोकांची आवश्यकता आहे. नाग लोक हे तुटलेले आहेत.

प्रमुख वक्ते एड. विजय सुरडकर म्हणाले की, राष्ट्रपती आदिवासी, प्रधानमंत्री ओबीसी ही माणसे आपली असली तरी त्यांचे मेंदू मात्र आपल्या विचारांचे नाहीत. ज्यामुळे देशाच्या प्रथम नागरिक असलेल्या राष्ट्रपतींना सुद्धा उद्घाटनाला बोलावले जात नाहीत. याचे मूळ शोधून सुगरणीचा घरटा तैयार करावा लागेल. शेजारच्या माणसाबरोबर जयभीम बोलायला लाज वाटणारा समाज तैयार होत आहे, ही अधोगती कडे जाणारी वाटचाल होय. सामाजिक व राजकीय चारित्र्य असलेल्या नेतृत्वाचा स्विकार केला पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ सप्टेंबर २९४४ ला मद्रास येथे शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा होय असे म्हटले होते. त्यापूर्वी ७ व ८ मे १९३२ ला नागपूर येथील अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या अधिवेशनात अस्पृश्य समाजाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. असे म्हटले होते. त्या विधानाची वर्तमान प्रासंगिकता आणि सदर्भ लक्षात घेऊन सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी संघर्ष केला असला तरी पुढे जाऊन मानवतावादी दृष्टीकोनातून या देशातील द्रविड व नाग लोक एकच असल्याचे स्पष्ट करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लढा दिला आहे. याची पार्श्र्वभूमी लक्षात घेऊन नाग समुदायाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. या विषयावर आज आपण वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन केले आहे. जेणेकरून समाजाची होत असलेली दुरावस्था आणि नेतृत्वात निर्माण झालेली निर्वात पोकळी याची जाणीव होऊ शकेल. समाजातील वसाहतीतील विहारात आपले योग्य प्रतिनिधी, अध्यक्ष, सचिव निवडण्यास सक्षम नसणारा समाज आपले योग्य प्रतिनिधी, आमदार, खासदार निवडून विधायिकेत कसे पाठविणार आहे? अशी भिषण परिस्थिती समाजात असल्याने हा विषय ऐरणीवर आणून चर्चा करने गत्यंतर झाले आहे. मागील महिन्यात फुले आंबेडकर जयंती देशभरात साजरी करण्यात आली. ज्यावर कुंभकर्णीय झोपेतून जागे होणाऱ्या हितचिंतकांनी भावनिकतेपोटी कोट्यवधी रुपयांचा आर्थिक चु-हाडा नाचगाणी आणि डी. जे. वर केला आहे. ज्या बळावर योग्य प्रतिनिधी निवडून आणण्यासाठी वैचारिक प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे आवश्यक होते. ते न केल्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ समजून घेण्याची प्रक्रिया मंदावली असल्याने नेतृत्वहीन समाजात नेतृत्व निर्माण करण्याचा वसा घेतल्याची वल्गना करणारे सुद्धा नेतृत्वहीन झाल्याची जाणीव होत आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे केवळ निवडणुक जिंकल्याने राजकीय पक्षाचे अस्तित्व कायम राहणार नाही तर जनतेला शिक्षित करून संघटीत होण्यासाठी संघर्ष करायला भाग पाडण्याची प्रक्रिया सातत्याने समाज जीवनात राबविली पाहिजे. करिता अनंत नाग, वासुकी नाग, तक्षक नाग, कारकोटम नाग, ऐरावत नाग या सारख्या प्रचारक आणि प्रसारकांची फौज निर्माण केली तरच नाग समुदायाच्या हाती राजकीय सुत्रे येऊ शकतील. या अनुषंगाने आपण सर्वांनी मार्गक्रमण करावे.

या कार्यशाळेच्या सुरुवातीला स्मृतीशेष पँथरनेते गंगाधर गाडे यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यशाळेला महादेव डांबरे, एड. विलास रामटेके, डॉ. व्ही. एच. कांबळे, राजू काटोले, धनराज गोंडाणे, एड. विजय सुरडकर, प्रा. मंगला झिने, संघदीप रोडगे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# समता स्वातंत्र्यता समानता आणि अखंडता जोपासण्यासाठी संविधानाची गरज

## देशात असंतुष्ट लोकांपासुन संविधान वाचविण्यासाठी बहुजनानी लढा उभा करावा : एस.के.भंडारे



**नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे**

डॉ बाबासाहेब आंबेडकरानी २ वर्ष ११ महिने १७ दिवस अहोरात्र कष्ट करून आपल्या तल्लक बुद्धीने १९४९ साली भारत देशाचे सर्वांत मोठे आणि महान संविधान तयार केले, भारतीय स्वातंत्र्यात काहीही न केलेले मनुवादी विचाराच्या लोकांनी, संघटनानी असंतुष्ट नागरीकानी संविधानास गोधडी म्हटले, भारतीय संविधान जगात संपूर्ण विश्र्वात सर्वश्रेष्ठ संविधान समजले जाते हे संविधान मनुवादी विचाराच्या लोकांमध्ये गैरसमज होत आसेल तर संविधाना मधील प्रत्येक शब्दाचा अर्थ समजुन घ्या तुम्हाला संविधान समजेल . आणि तीन कलर असलेला राष्ट्रध्वज अशुभ आहे आशी मानसीकता झाली आहे किंवा मनुवादी व्यवस्था विचारसरणीचे लोक सत्तेत येऊन त्यांना संविधान बदलून धर्मावर आधारित असलेले संविधान पाहिजे, त्यात सर्वांना समानता नसणार म्हणजे आम्ही पुन्हा अस्पृश्य - गुलामीत जाणार अशी भीती समाजात पसरली असल्याने संविधान वाचविण्या साठी आपल्याबरोबर बहुजनांचा ही लढा उभा करावा लागेल असे परखड मत राष्ट्रीय उपाध्यक्ष व समता सैनिक दलाचे स्टाफ ऑफिसर एस के भंडारे यांनी भारतीय बौद्ध महासभा शाखा पूर्व मुंबई जिल्हा झोन क्र.५च्या वतीने महामानव विचार जयंती आणि भारतीय संविधान संरक्षण अभियान अंतर्गत संयोग सेवा सोसायटी हॉल, येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्यात बोलताना व्यक्त केले .

एस के भंडारे पुढे असे म्हणाले की,डॉ भीमराव य आंबेडकर यांनी घोषित केल्याप्रमाणे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक, धार्मिक व राजकीय क्रांती गतिमान करण्यासाठी संविधान विरोधकांना मतदान करायचे नाही आणि जर संविधान बदलले तर भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल रस्त्यावर येऊन आंदोलन करेल.

या वेळी मुंबई प्रदेशचे कोषाध्यक्ष विलास खाडे यांनी अँड प्रकाश आंबेडकर यांच्या पाठीशी राहू मत यावेळी व्यक्त केले .

या संवाद मेळाव्याचे आयोजन मिलिंद कसबे व आनंद वानखडे यांनी केले.सूत्रसंचालन झोन ५ चे उपाध्यक्ष दिलीप लिहिणार यांनी केले. यावेळी सिद्धार्थ रणपिसे, संघामित्रा पारखे, कैलास खाडे, ओंकार वानखडे, शशिकांत गायकवाड, विजय सोनवणे इत्यादी झोन क्रमांक ५, लिंबूनी बाग ,नालंदा बुद्ध विहार नागसेन बुद्ध विहार अमर महल , लल्लूभाई कंपाउंड, तक्षशिला बुद्ध विहार भिमवाडी आनंदनगर,गौतमनगर या शाखांचे पदाधिकारी, केंद्र शिक्षक,शिक्षिका,बौद्धाचार्य समता सैनिक दलाचे सैनिक, उपासक-उपासिका मोठया संख्येने उपस्थित होते त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व वंचित-बहुजनांचे नेते अँड प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस टाळ्या व स्वाभिमान दिनाचा जयघोष करून केला.

# जात प्रमाणपत्रावरून डॉ.जयसिध्देश्वर महाराज यांच्या अडचणी वाढणार

**सोलापूर/प्रतिनिधी:**

मावळते खासदार डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी यांच्या जात वैधता प्रमाणपत्रावर तीन महिन्यात निर्णय घ्यावा, असा आदेश १० मे रोजी मुंबई उच्च न्यायालयाने सोलापूरच्या सामाजिक न्याय विभागातील जात पडताळणी समितीला दिला आहे. खासदारकीची टर्म संपण्याच्या उंबरठ्यावर असताना उच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे डॉ. जयसिध्देश्वर महाराज यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.



२०१९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र दाखल केल्याची तक्रार प्रमोद गायकवाड यांच्यासह कंदकुरे, मिलिंद मुळे यांनी जात पडताळणी समितीकडे केली होती. या तक्रारीवरून समितीने दक्षता पथक नेमून तपास केला होता. त्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने पडताळणी केली. पुराव्याच्या आधारे समितीने डॉ. जयसिध्देश्वर यांचे जात प्रमाणपत्र वैध नसल्याचा नकाल दिला. याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात भादंवि कलम ४२० नुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता.

सोलापूर शहर गुन्हे शाखेने याप्रकरणी डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य यांची चौकशी केली होती. समितीने आम्हाला आमची बाजू मांडायला पुरेसा वेळ दिला नसल्याचे म्हणणे मांडले होते. त्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने पडताळणी समितीला खासदारांच्या जात वैधता प्रमाणपत्राची फेरचौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार समितीने सहा महिन्यांची मुदत मागून घेतली होती. मात्र, सहा महिन्यांत चौकशी अहवाल तयार झाला नाही. त्यामुळे समितीने पुन्हा सहा महिन्यांची मुदत मागितली होती. त्यावर उच्च न्यायालयाने सहा महिन्यांची मुदत न देता ीन महिन्यात जात प्रमाणपत्रावर निर्णय देण्याचा आदेश दिला आहे. हा आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश ए. एस. चांदुरकर व जितेंद्र जैन यांनी दिला आहे.

# जेऊरच्या विवाह सोहळ्यात १९ जोडप्यांच्या बांधल्या गाठी

अक्कलकोट/प्रतिनिधीः जेऊर येथील श्री काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व श्री काशीलिंग बहुउद्देशीय संस्था यांच्यावतीने आयोजित सामुदायिक विवाह सोहळयात १९ जोडपी विवाहबद्ध झाली. याचवेळी सामाजिक बांधिलकीचा उपक्रम म्हणून अयोध्या येथील रामललांच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठानाच्या वेळी पौरोहित्य म्हणून प्रमुख भूमिका बजावलेले पंडित दीक्षित कुटुंबीय तसेच ७५ वर्षांवरील ३० शेतकरी बांधवांचादेखील सन्मान करण्यात आला. यावेळी काशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी, श्री शिवानंद शिवयोगी महास्वामी, श्री नीलकंठ शिवाचार्य महास्वामी, श्री श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी, श्री राजशेखर शिवाचार्य महास्वामी, श्री अभिनव बसवलिंग महास्वामी, श्री शिवशंकर शिवाचार्य महास्वामी, श्री चन्नमत महास्वामी, श्री शांतलिंग शिवाचार्य महास्वामी, महानंदाताई हिरेमठ, अब्दुल रौफ सरदार पाशा पिरजादे बाबा, सद्गुरू पांडुरंग महाराज आदी मठाधीश आणि आमदार रणजितसिंह मोहितेपाटील, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, सिद्धार्थ गायकवाड, अश्पाक बळोरगी, गुरुशांत पाटील, सिद्धाराम भंडारकवठे आदींची प्रमुख उपस्थिती होती. काशीलिंग बहुउद्देशीय संस्थेच्या मल्लिकार्जुन पाटील व मित्रपरिवारांकडून ८ वर्षात १५६ जोडपे विवाहबद्ध झाली आहेत. तसेच चालू वर्षी १९ जोडप्यांचा विवाह सोहळा त्या-त्या धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी गावातील मुख्य रस्त्यावरून वधू-वरांची मिरवणूक काढण्यात आली, सुग्रास भोजन, वऱ्हाडी मंडळींसाठी शिदोरी बांधून देणे आदींची व्यवस्था केली गेली होती. तत्पूर्वी वाराणसी येथील रामलल्लांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना केलेले पुरोहित तथा जेऊरचे रहिवासी सुनील लक्ष्मीकांत दीक्षित तसेच अरुण लक्ष्मीकांत दीक्षित हे दोघे बंधू सपत्नीक उपस्थित होते.



यावेळी काशीलिंग बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांनी प्रास्ताविक केले. अक्षतासोहळ्यापूर्वी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांचे आशीर्वचन झाले. यावेळी महेश म्हेत्री आणि त्यांच्या पथकाचे सुमधुर गायनाचा कार्यक्रम झाला. शेवटी या एकोणीस जोडप्यांच्या ३८ घरांसाठी सायंकाळी घरी गेल्यावर त्यांना जेवणाची सोय व्हावी, यासाठी त्यांना शिदोरी बांधून देऊन त्यांची सोय करण्यात आली.